मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पवना धरण शंभर टक्के भरले; विसर्ग सुरु

## पिंपरी चिंचवडवासीयांची वर्षभराच्या पाण्याची चिंता मिटली; नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील अनेक खेडी आणि पिंपरी-चिंचवड शहरवासियांची पाण्याची चिंता अखेर दूर झाली आहे. मावळ परिसराला आणि पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणारे प्रमुख पवना धरण आज (दि. १९ ऑगस्ट) ९९.७० टक्के भरून जवळपास शंभर टक्के क्षमतेवर पोहोचले आहे. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला असला तरी धरणातून सुरू झालेल्या विसर्गामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून पवना धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू असून धरणात पाण्याचा मोठ्या प्रमाण वाढलेआहे. त्यामुळे दुपारी साडेतीनच्या सुमारास धरणाचे सहाही दरवाजे उघडून ५७६० क्युसेक तर विद्युतगृहातून १४०० क्युसेक असा एकूण ७१६० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. यामुळे कोथुर्णे पुलावरून पाणी गेले असून मळवंडी ठुले, वारु आणि कोथुर्णे गावाकडे जाणारा रस्ता बंद करण्यात आला आहे.



आज मंगळवारी सकाळपासून धरण क्षेत्रात तब्बल ३१ मि.मी. पाऊस झाला. विशेषतः धरणाच्या बॅकवॉटर भागात पावसाचा जोर अधिक असल्याने धरणात पाण्याचा सतत ओघ सुरूच आहे. पावसाचा अंदाज लक्षात घेऊन विसर्गाचे प्रमाण कमी-जास्त केले जाऊ शकते, असे धरण विभागाचे अधिकारी रजनीश बारिया यांनी सांगितले. नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहनही त्यांनी केले असून नदीकाठच्या गावकऱ्यांनी नदीपात्रात जाणे टाळावे व सुरक्षित अंतर राखावे, असेही आवर्जून सांगितले.

# डिजिटल मॅमोग्राफी व्हॅनद्वारे महिलांसाठी स्तन कर्करोग तपासणी शिबिर

## उपक्रमाद्वारे महिलांना मोफत तपासणीची सुविधा; शहरातील 70 हून अधिक महिलांनी घेतला लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभाग व इंडियन मेडिकल असोसिएशन (पीसीबी शाखा) यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. इंदिरा गांधी प्रसूतीगृह, सांगवी रुग्णालय येथे महिलांसाठी विशेष स्तन कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे व इंडियन मेडिकल असोसिएशन (पीसीबी शाखा) चे डॉ. दिलीप कामत यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.




या शिबिरात अत्याधुनिक डिजिटल मॅमोग्राफी व्हॅनचा वापर करण्यात आला. या व्हॅनमध्ये उच्च रिझोल्यूशन एक्स-रे तंत्रज्ञान, संगणकीय प्रतिमा प्रक्रिया प्रणाली, आणि तज्ज्ञ तांत्रिक कर्मचारी उपलब्ध असतात. यामुळे स्तनातील गाठ, ऊतकांतील सूक्ष्म बदल किंवा कर्करोगाची प्रारंभिक लक्षणे अगदी कमी डोसच्या किरणोत्सर्गाने अचूकपणे शोधता येतात. डिजिटल पद्धतीमुळे तपासणीचे परिणाम त्वरित मिळतात व त्यांचे संग्रहण पुढील उपचारासाठी सुलभ होते.

या उपक्रमाद्वारे महिलांना मोफत तपासणीची सुविधा मिळाली. शिबिरात ७० हून अधिक महिलांनी तपासणी करून घेतली व स्तन कर्करोग प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन मिळविले.

या प्रसंगी ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. तृप्ती सागळे, डॉ. ललित धोका, डॉ. मिलिंद सोनवणे, डॉ. प्रकाश रोकडे तसेच डॉ. रितू लोखंडे उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करून घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

शिबीर यशस्वी करण्यासाठी नोडल अधिकारी डॉ. वैशाली भामरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. करुणा साबळे, सांगवी रुग्णालयातील कर्मचारीवृंद तसेच आशा स्वयंसेविका यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. येत्या काळात अशा शिबिरांचे आयोजन महापालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये करण्याचे योजिले असून, नागरिकांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवून लाभ घ्यावा असे आवाहन वैद्यकीय विभागातर्फे करण्यात आले आहे.

# आपत्कालीन परिस्थितीसाठी यंत्रणांनी सज्ज राहावे

## नदीकाठ परिसरातील नागरिकांनी सतर्क रहावे; महापालिका आयुक्त शेखर सिंह

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरणाच्या पाणलोट क्षेत्रात संततधार पाऊस सुरू आहे. हवामान विभागाकडून पुणे जिल्ह्यासाठी आज रेड अलर्ट देण्यात आला असून पुणे जिल्हा व घाट परिसरात पुढील तीन तासात ४० ते ६० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्यासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शिवाय पिंपरी चिंचवड शहरातून वाहणाऱ्या नद्यांवरील धरणामधून करण्यात येणाऱ्या विसर्गामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे.

या पार्श्वभूमीवर नदीकाठ परिसरातील नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे. पावसामुळे उद्भवणारी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहण्याचे निर्देश देखील आयुक्त सिंह यांनी प्रशासकीय यंत्रणांना दिले आहेत.



गेल्या काही दिवसांपासून शहर परिसरात पावसाची संततधार सुरू आहे. शहरातून वाहणाऱ्या पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होत असून यामध्ये धरणातून विसर्ग देखील केला जात आहे. विशेषत: पवना धरण जवळपास ९७ टक्के भरले आहे. या धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस पडत असून धरणातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी नदीपात्रामध्ये पाण्याचा विसर्ग केला जात आहे. आज सकाळी ९ वाजता सुमारे ५ हजार ६६० क्युसेक इतका विसर्ग या धरणातून पवना नदीपात्रात करण्यात आला. पावसाच्या प्रमाणानुसार आणि येव्यानुसार धरणातून नदीपात्रात होणाऱ्या विसर्गाचे प्रमाण अवलंबुन असल्याचे पवना धरण पूर नियंत्रण कक्षाच्या वतीने सांगण्यात आले आहे. यासर्व बाबी विचारात घेता महापालिकेच्या सर्व यंत्रणांनी दक्ष राहण्याचे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले.

नदीकाठच्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करावे लागल्यास त्याठिकाणी भोजन, वैद्यकीयसह सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करावी, क्षेत्रीय कार्यालयांमार्फत जलद प्रतिसाद पथकाने दिवसरात्र नदीकाठ परिसरावर लक्ष ठेवावे, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांशी समन्वय साधून त्याभागातील आपत्कालीन परिस्थिती हाताळावी, असे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक साधनसामुग्रीसह आपत्कालीन पथकाने सज्ज राहावे, सखल भागात नदीच्या पाणी पातळीची माहिती देण्यासाठी ध्वनीक्षेपकाद्वारे त्याभागात वारंवार सूचना देण्यात याव्यात, असेही त्यांनी सांगितले. पावसामुळे साथीच्या आजारांचा प्रसार होऊ नये यासाठी धुरीकरण, औषध फवारणी, तसेच नागरिकांची आरोग्य तपासणी यावर भर देण्यात यावा, वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून कार्यवाही करावी, अशा सूचना देखील आयुक्त सिंह यांनी दिल्या.

महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्यासह वरिष्ठ अधिकारी परिस्थितीचा नियमित आढावा घेत असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. नागरिकांनी कोणतीही आपत्कालीन मदत हवी असल्यास महापालिकेच्या मुख्य नियंत्रण कक्ष क्रमांक ०२०-६७३३११११ / ०२०-२८३३११११ किंवा अग्निशमन विभागाच्या ७०३०९०८९९१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे महापालिका प्रशासनाने सांगितले आहे.

### अग्निशमन विभागाचे महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक:

- पिंपरी मुख्य अग्निशमन केंद्र – ९९२२५०१४७५
- भोसरी अग्निशमन केंद्र – ९९२२५०१४७६
- प्राधिकरण अग्निशमन केंद्र – ९९२२५०१४७७
- चिखली अग्निशमन केंद्र – ८६६९६९४१०१
- थेरगाव अग्निशमन केंद्र – ७०३०९०७९९९
- रहाटणी अग्निशमन केंद्र – ९९२२५०१४७८
- मोशी अग्निशमन केंद्र – ७२६४९४३३३३
- तळवडे अग्निशमन केंद्र – ९५५२५२३१०१

# राज्य शासनाच्या आरोग्य कार्यक्रम रँकिंगमध्ये पिंपरी चिंचवड अव्वल

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने पुन्हा एकदा राज्यभरात आपले वर्चस्व सिद्ध केले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने पुन्हा एकदा राज्यभरात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयामार्फत नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या एप्रिल व मे २०२५ च्या आरोग्य कार्यक्रमांच्या रँकिंगमध्ये पिंपरी चिंचवड महापालिका राज्यात प्रथम क्रमांकावर राहिली आहे.

एप्रिल महिन्यात ४५.१८ गुणांसह पिंपरी चिंचवड महापालिकेने पहिला क्रमांक पटकाविला तर मे महिन्यात सर्व बाबींवर अधिक प्रगती करत ४७.७० गुण मिळवून पुन्हा आपले प्रथम स्थान अबाधित ठेवले.

या रँकिंगमध्ये मातृत्व आरोग्य, बाल आरोग्य, लसीकरण, कुटुंब नियोजन, किशोरवयीन आरोग्य,




पीसीपीएनडीटी, आरसीएच पोर्टल, आयडीएसपी, क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, रेबीज नियंत्रण कार्यक्रम, कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम, डेंग्यू व मलेरिया नियंत्रण, असंसर्गजन्य आजार नियंत्रण, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मानांकन, ई-औषधी, मोफत निदान सेवा, आयुष्मान भारत-आरोग्य व आरोग्य कल्याण केंद्रे, एचआयव्हीएस, आशा कार्यक्रम तसेच प्रशासन व वित्तीय व्यवस्थापन अशा महत्त्वाच्या निर्देशकांचा समावेश होता. या सर्व बाबींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत पिंपरी चिंचवड महापालिकेने राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या या यशामुळे पुन्हा एकदा हे अधोरेखित झाले आहे की, सुयोग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळेच आरोग्यसेवेत उत्तम कामगिरी साधता येते.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने सलग दोन महिने राज्यातील पहिल्या क्रमांकावर राहून आरोग्य क्षेत्रातील कामगिरी सिद्ध केली आहे. ही यशस्वीता आपल्या वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर आणि सर्व नागरिकांच्या सहकार्यामुळे शक्य झाली आहे. आम्ही हीच गती कायम ठेवत पुढील काळातही जनतेस उत्तमोत्तम आरोग्य सुविधा देत राहू.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

> आरोग्य सेवा पोहोचवताना प्रत्येक स्तरावर काम करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांपासून रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांपर्यंत सर्वांचा सहभाग महत्त्वाचा ठरला आहे. ही राज्यस्तरीय कामगिरी शहरातील प्रत्येकासाठी अभिमानाची आहे. आगामी काळात आणखी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून आपण ही कामगिरी टिकवून ठेवू, असा आम्हाला विश्वास आहे.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# पुणेकरांचा वाहतूक कोंडीचा त्रास कमी होणार

## पुणे युनिव्हर्सिटी चौक ते RBI दरम्यान प्रवास होणार अधिक वेगवान आणि सुलभ

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे विद्यापीठाजवळील वाहतूक कोंडीने त्रस्त झालेल्या नागरिकांना आता काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील राजभवन ते आरबीआय गणेशखिंड रस्त्यावरील उड्डाणपुलाचा पहिल्या टप्प्याचं उद्घाटन बुधवारी 20 ऑगस्टरोजी होणार आहे. संध्याकाळी साडे पाचच्या सुमारास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत पुलाच्या लोकार्पणाचा हा सोहळा पार पडणार आहे.



मेट्रोचे काम, रस्त्यावरील खड्डे आणि वाहनांची वाढती संख्या अशा परिस्थितीत अडकलेल्या पुणेकरांसाठी वाहतूक कोंडी ही रोजचीच तक्रार. कोरोना काळात विद्यापीठ चौकातील उड्डाणपूल मेट्रोच्या कामासाठी पाडण्यात आले होते. गेली साडे चार वर्ष विद्यापीठ चौकातील वाहतूक कोंडी ही पुणेकरांसाठी डोकेदुखीच ठरली होती. मेट्रो कामांमुळे रस्त्याची दुरावस्था, वाहनांच्या रांगा आणि त्यात खड्ड्यांमुळे कोंडीत पडणारी भर यामुळे पुणेकर चांगलेच वैतागले होते.

अखेर नागरिकांची या विद्यापीठ चौकातील वाहतूक कोंडीतून काही प्रमाणात सुटका होणार आहे. आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी देखील X या सोशल मीडिया प्लाटफॉर्मवर यासंदर्भातील माहिती दिली आहे. 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील राजभवन ते आरबीआय गणेशखिंड रस्त्यावरील उड्डाणपुलाचे बुधवारी लोकार्पण केले जाईल', अशी माहिती आ. शिरोळे यांनी दिली.

दरम्यान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील (SPPU) दुमजली उड्डाणपुलाचे कामही आता अंतिम टप्प्यात आले आहे. सध्या 88 ते 90 टक्के काम पूर्ण झाले असून शिवाजीनगर आणि औंध बाजूचे रॅम्प जवळपास तयार झाले आहेत. बाणेर आणि पाषाण बाजूचे रॅम्प ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होतील. उड्डाणपुलाची रंगरंगोटी आणि दिशादर्शक फलक लावण्याचे कामही वेगाने सुरू आहे. त्यामुळे या वर्षाखेरपर्यंत विद्यापीठ चौकातील वाहतूक कोंडीतून पुणेकरांची सुटका होण्याची चिन्हे आहेत.

### ..असा आहे प्रकल्प!

- लांबी: सुमारे २.१ किलोमीटर
- दुहेरी मार्गिका (Dual carriageway) – दोन्ही दिशांना स्वतंत्र वाहनचळवळीसाठी
- स्मार्ट लायटिंग आणि सीसीटीव्ही देखरेखीची सोय
- सेंद्रिय जलव्यवस्थापन आणि हरित पट्टा – पर्यावरणपूरक रचना

> पुणे युनिव्हर्सिटी चौक ते RBI चौक या महत्त्वाच्या उड्डाणपुलाचे उद्या उद्घाटन होत आहे, याचा मला अतिशय आनंद आहे. या प्रकल्पामुळे हजारो पुणेकरांचे दैनंदिन प्रवासाचे कष्ट कमी होतील. वाहतूक कोंडीचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होईल. आम्ही आधुनिक, शाश्वत आणि भविष्यातील गरजांसाठी सज्ज असणाऱ्या पायाभूत सुविधांच्या उभारणीस कटिबद्ध आहोत. पुणेकरांचे जीवन अधिक सुसह्य करण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.
>
> **- सिद्धार्थ शिरोळे, आमदार.**

# नवीन पुणे-नागपूर-पुणे वंदे भारत सुसाट

## सात दिवसांत 57 लाखांचे उत्पन्न; साडेचार हजार प्रवाशांचा प्रवास; दिवाळीतील बुकिंग फुल्ल

**पुणे | प्रतिनिधी**

नुकतीच सुरू झालेली पुणे-नागपूर (अजनी)-पुणे (ट्रेन क्रमांक 26101) वंदे भारत एक्स्प्रेसला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. अवघ्या सात दिवसांत साडेचार हजार प्रवाशांनी या नव्या कोऱ्या गाडीतून प्रवास केला. या माध्यमातून रेल्वे प्रशासनाला 57 लाखांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पुणे-नागपूर(अजनी)-पुणे या गाडीला मागील आठवड्यात ऑनलाइन पध्दतीने हिरवा झेंडा दाखवला. ही गाडी सुरू व्हावी, याकरिता पुणे आणि नागपूर येथील प्रवासी संघटनांनी मागणी केली होती.



त्याच्या पत्राची दखल घेत प्रशासनाकडून अखेर ही गाडी सुरू करण्यात आली. सध्या या गाडीला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सध्या पुणे-नागपूर वंदे भारत गाडीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. दिवसेंदिवस यामध्ये वाढ होत आहे. सोमवारी तर 160 टक्के ऑक्युपेन्सी झाल्याची नोंद झाल्याचे रेल्वेच्या संगणकीय यंत्रणेवर होती. दिवाळीच्या काळातील या रेल्वेगाडीचे बुकिंगही फुल्ल झाल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

**स्लीपर वंदे भारतची व्यवस्था करा**

सध्या पुणे-नागपूर-पुणे यादरम्यान धावणारी वंदे भारत एक्स्प्रेस चेअर कार आणि एक्झिक्युटिव्ह क्लास प्रकारात उपलब्ध आहे. पुणे-नागपूर प्रवासादरम्यान 12 ते 13 तासांचा प्रवास आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना हा प्रवास बसून करणे अवघड होणार आहे. त्यामुळे अनेक प्रवाशांनी ही गाडी स्लीपर कोचमध्येही सुरू करावी, अशी मागणी पुणे-नागपूर दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी केली.

**पुणे-नागपूर वंदे भारत...(ट्रेन क्रमांक 26101)**

(दि. 11 ते 17) फेऱ्या - 07
उत्पन्न - 57 लाख 11,380
प्रवासी - 4,233

पुणे-नागपूर वंदे भारत एक्स्प्रेस तिकीट दर
चेअर कार - 2,040
एक्झिक्युटिव्ह क्लास-3,725

> पुणे-नागपूर-पुणे वंदे भारत एक्स्प्रेस गाडीला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सुरू झाल्यापासून आत्तापर्यंत सात दिवसांत 4 हजार 233 प्रवाशांनी या गाडीतून प्रवास केला आहे. त्याद्वारे दिनांक 11 ते 17 ऑगस्ट 2025 दरम्यान 57 लाख 11 हजार 380 रुपये प्राप्त झाले आहे.
>
> **- अनिलकुमार पाठक, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, मध्य रेल्वे, पुणे विभाग**

# विक्रेत्यांना यंदा ठेवावी लागणार गणेशमूर्तींची नोंद

## महापालिकेच्या वतीने यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा

**पुणे | प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालय, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'प्लास्टर ऑफ पॅरिस' (पी.ओ.पी.) श्री गणेश मूर्तींची विक्री करताना विक्रेत्यांना त्याची नोंद ठेवणे आणि मूर्तीच्या मागील बाजूस स्पष्टपणे दिसेल अशा स्वरुपात ऑईल पेंटने लाल रंगाचे गोलाकार चिन्ह करणे बंधनकारक राहणार आहे. महापालिकेनेही गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा करावा, असे आवाहन केले आहे.

महापालिकेच्या वतीने यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा, यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 'पीओपी'च्या मूर्तींची विक्री करताना आवश्यक मार्गदर्शक सूचनांचे पत्रक महापालिका प्रशासनाने तयार केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या आहेत.

"पीओपी"च्या सहा फुटांपेक्षा कमी उंचीच्या मूर्तींचे केवळ कृत्रिम तलावातच विसर्जित करावे, सार्वजनिक मंडळाच्या मोठ्या मूर्तीऐवजी प्रतीकात्मक स्वरुपात लहान मूर्तीचे विसर्जन करावे, सहा फुटांपेक्षा जास्त उंचीच्या मूर्तींच्या विसर्जनासाठी इतर कोणताही पर्याय उपलब्ध नसेल, तर ती मूर्ती नैसर्गिक जलस्रोतात विसर्जित करावी. मात्र, ही मूर्ती शाडू माती, चिकणमातीची असावी,' या सूचना करण्यात आल्या आहेत.

'गणेश मूर्तीचे दागिने बनविण्यासाठी वाळलेली फुले, पेंढा यांचा वापर करावा आणि मूर्ती आकर्षक बनविण्यासाठी झाडांची नैसर्गिक उत्पादने रेझीन्सचा चमकदार सामग्री वापरावी. मूर्ती रंगविण्यासाठी पर्यावरणास अनुकूल रंग, जैव विघटनशील आणि बिनविषारी नैसर्गिक रंगाचा वापर करावा, नैसर्गिक साहित्य आणि रंग वापरून बनवलेले व काढता येण्याजोगे आणि धुण्यायोग्य सजावटीचे कपडे वापरावेत,' असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



उत्सवाच्या काळात विसर्जन घाटावर विजेचे दिवे आणि जनरेटरची सोय केली जाणार आहे. तसेच, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी घाटावर सीसीटीव्ही बसविले जाणार आहे. सहा फुटांपेक्षा कमी उंचीच्या गणेश मूर्ती संकलित केल्या जाणार आहेत. यासाठी लवकरच स्वयंसेवी संस्थाची बैठक घेतली जाणार आहे, असे पालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.

**पदपथ अडथळे मुक्त करणार**

**» गणेशोत्सवाच्या काळात भाविकांना चालण्यासाठी पदपथ अडथळे मुक्त केले जाणार आहेत. तसेच, विसर्जन घाटावरील हौदाची स्वच्छता करण्याचे काम तातडीने करावे, अशा सूचना महापालिका प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.**

# पानशेत, वरसगाव, मुठा खोऱ्यात संततधार

## मुठा नदीकाठच्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा; धरणसाखळीत 91.94 टक्के पाणीसाठा

**पुणे | प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील घाटमाथ्यासह पानशेत, वरसगाव, मुठा खोऱ्यात सोमवारी (दि. 18) सकाळपासून संततधार पाऊस सुरू आहे. नद्या, ओढे, नाले, दुथडी भरून वाहत असल्याने धरणसाठ्यात वेगाने वाढ सुरू आहे. सायंकाळी 5 वाजता धरणसाखळीत 26.80 टीएमसी म्हणजे 91.94 टक्के साठा झाला होता.

गेल्या 24 तासांत धरणसाखळीत 0.66 टीएमसी पाण्याची भर पडली. रविवारी (दि. 17) सायंकाळी पाच वाजता धरण साखळीत 26.14 टीएमसी पाणी होते. टेमघर धरणातून 300 क्युसेक पाणी सोडले जात आहे.

पानशेत आणि वरसगावच्या पाणीपातळीत वाढ होत असल्याने मंगळवारी (दि. 19) दोन्ही धरणांतून पाणी सोडले जाणार आहे. त्यामुळे खडकवासला धरणातून जादा पाणी मुठा नदीत पाणी सोडावे लागणार असल्याने जलसंपदा विभागाने नदीकाठच्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील पानशेत व वरसगाव धरण क्षेत्रातील तव, धामण ओहोळ, साखरी, मुगाव, दापसरे, कुर्तवडी, टेकपोळे, माणगाव आदी ठिकाणी संततधार पावसासह अधूनमधून जोरदार सरी कोसळत आहेत. मोसे, आंबी नद्या ओढे दुथडी भरून वाहत आहेत.



> पानशेत व वरसगावमध्ये 94 टक्क्यांहून अधिक पाणीसाठा झाला आहे. धरणक्षेत्रात संततधार पाऊस असल्याने पाण्याची आवक वाढली आहे. 96 टक्के पाणीसाठा झाल्यावर दोन्ही धरणांतून पाणी सोडले जाणार आहे. त्यामुळे खडकवासलातून जादा पाणी मुठा नदीत सोडले जाणार आहे.
> **- मोहन भदाणे, उपविभागीय अभियंता, खडकवासला जलसंपदा विभाग.**